# विद्यापीठात सेवानिवृत्तीप्रसंगी कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न

अमरावती -

विद्यापीठ सेवेतून मागील तीन महिन्यात विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांचा उभयता सत्कार कुलगुरू डॉ. विलास भाले यांचे शुभहस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देवून, तर साडीचोळी व चांदीचा करंडा देवून सौ. रजनी चपाटे यांनी केला. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, प्रमुख अतिथी म्हणून व्य.प. सदस्य डॉ. अरुणा पाटील, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख तसेच नियंत्रण अधिकारी उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. अरुणा पाटील म्हणाल्या, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांचे कार्य कौतुकास्पद व कर्तव्यदक्ष राहिले आहे, हे सांगतांना मला अभिमान वाटतो. विद्यापीठाचे कर्मचारी कार्यक्षमतेने काम करतात, विद्यार्थ्यांच्या समस्यां सोडविण्यासाठी ते कार्यतत्पर असतात. विद्यापीठातील गतीमान प्रशासनामुळे सर्व प्रशासकीय कामे गतीमानतेने होत असून विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा परिपूर्ण प्रयत्न केल्या जातो. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर आपल्या कुटुंबासमवेत वेळ मिळणार असून त्यांनी आपला छंद जोपासून सकारात्मक विचार ठेवावा व आपली प्रोढावस्था दीर्घकाळ टिकून ठेवावी, असेही त्या म्हणाल्या. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या दीर्घ निरोगी आयुष्याकरीता त्यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्यात.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. विलास भाले यांनी सुरुवातीला आपल्या सेवेत ज्यांनी जास्त काम केले आहे, त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य नेहमीच सुखी जाते. सेवानिवृत्तीनंतर आराम न करता व्यायाम, योगासने करा. सेवाकाळात केलेल्या कार्याचे स्मरण करा. आपल्या कुटुंबात रमा, खेळा, बाळगा व मित्रांशी गप्पा, गोष्टी करा, म्हणजे आपले आयुष्य निरोगी, समाधानी व आनंददायी बनेल. चांगली कामे विसरल्या जातात, पण एखादी चूक झाली, ती नेहमीकरीता लक्षात राहते. त्यामुळे सर्वांनी सकारात्मकतेने कार्य करण्याचा निश्चय करावा. सेवाकाळात आपण सर्वजण समाजाला सेवा देण्यासाठी सातत्याने कार्य करतो. सेवानिवृत्तीनंतरही मी समाजाला देणे लागतो, या भावनेने समाजासाठी जी सेवा देता येईल, ती प्रत्येकाने द्यावी, असे आवाहन याप्रसंगी कुलगुरूंनी केले. याप्रसंगी विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री दिपक काळे व सचिव श्री प्रवीण पडोळे यांनी सर्व सत्कारमूर्तींचा यावेळी पतसंस्थेच्यावतीने सत्कार केला. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे यांनी मानले. कार्यक्रमाला सत्कारमूर्ती न.न.सा. मंडळाचे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, उपकुलसचिव (आस्थापन) श्री प्रवीण राठोड, सहा. कुलसचिव (महाविद्यालयीन) डॉ.आर.यु. येवतीकर, सहा. कुलसचिव (मागासवर्ग कक्ष) श्री संजय अेरंडे, वरीष्ठ सहायक (कासु) श्री पी.ए. भुजाडे, आरेखक (अभियांत्रिकी) श्री एम.आर. खोपे, वरीष्ठ सहायक (कुलगुरू कार्यालय) श्री डब्ल्यु.एस. धस्कट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ (रासायनिक तंत्रशास्त्र) सौ.के.एस. जाखोटिया, कनिष्ठ सहायक (परीक्षा) श्री जी.ए. कवाने, कनिष्ठ सहायक (विद्या) श्री एस.एस. पाटील, कनिष्ठ सहायक (भांडार) श्री आर.पी. पाळेकर, कनिष्ठ सहायक (भांडार) सौ.ए.पी. गावंडे, शिपाई (सारणी) श्री व्ही.बी. दहीकर व शिपाई (मागासवर्ग कक्ष) श्री पी.टी. बालपांडे उभयता उपस्थित होते. तसेच नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ.ए.बी. नाईक, पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्राचे प्र. अधिकारी डॉ.व्ही.एस. चौबे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड, श्री मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील, डॉ.डी.आर. चव्हाण व सहा. कुलसचिव श्री.एस.ए. अेरंडे उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/०८/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी